लोकमत




विद्यापीठात आयोजित निवडणूक साक्षरता मंच सक्षमीकरण व प्रशिक्षण कार्यशाळेत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मार्गदर्शन केले. डॉ. पी. एस. पाटील, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, डॉ. राजा दयानिधी, आदी उपस्थित होते.

# विद्यापीठात निवडणूक साक्षरता मंच सक्षमीकरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग, कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्हा प्रशासन आणि सोशल ॲक्शन अकाउंटेबिलिटी फोरमतर्फे निवडणूक साक्षरता मंच सक्षमीकरण व प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात पार पडली.

राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या कार्यशाळेसाठी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. जिल्हाधिकारी राहुल रेखावार, सांगलीचे जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, प्र कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, साफ संस्थेचे संचालक लेफ्टनंट कर्नल पंजाबराव देशमुख, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांतील उपजिल्हाधिकारी उपस्थित होते. यावेळी राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त श्रीकांत देशपांडे, राहुल रेखावार, प्रा. डॉ. पी. एस. पाटील, प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालय, साफ संस्था, शिवाजी विद्यापीठ यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य करार केला. डॉ. टी. एम. चौगले यांनी सर्व स्वागत केले. डॉ. पोपटराव माळी, प्रा. संदीप पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात निवडणूक साक्षरता मंच सक्षमीकरण व प्रशिक्षण कार्यक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना आणि महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग तसेच कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हा प्रशासन आणि सोशल अ‍ॅक्शन अकौंटेबिलिटी फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने निवडणूक साक्षरता मंच सक्षमीकरण व प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के होते.

प्रास्ताविक डॉ. टी. एम. चौगले यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे त्याचबरोबर कोल्हापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी राहुल रेखावार व सांगली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांच्यासह सांगली व कोल्हापूर जिल्ह्याचे उपजिल्हाधिकारी उपस्थित होते.

या उपक्रमासाठी राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त श्रीकांत देशपांडे यांनी ऑनलाईन पद्धतीने मार्गदर्शन केले. जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी मतदार नोंदणी, मतदार जागृती आणि सर्व शैक्षणिक संस्थांचा या प्रक्रियेतला सहभाग वाढावा यासाठी आवाहन केले. सांगली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनीही मतदान नोंदणी आणि निवडणूक जनजागृती मार्गदर्शन केले. 'सॅफ'चे संचालक लेफ्टनंट कर्नल पंजाबराव देशमुख यांनी उपक्रमाबद्दल माहिती दिली.

अध्यक्षीय भाषणात शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी निवडणूक साक्षरता मंच सक्षमीकरण करण्यासाठी अनेक उपाय सुचवले. सूत्रसंचालन डॉ. पोपटराव माळी आणि प्रा. संदीप पाटील यांनी केले. आभार सार्थक कोळेकर यांनी मानले.

10 NOV 2023 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




वारणानगर : येथील तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये प्रेरणा व स्वागत समारंभाचे उद्घाटन डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते झाले. या वेळी प्राचार्य डॉ. जॉन डिसोझा, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते

# निरंतर विद्यार्थी दशेत राहणे हीच यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली

## डॉ. व्ही. एन. शिंदे : वारणानगर येथे कार्यक्रम

वारणानगर, ता. ९ : माणसाने कायम विद्यार्थी दशेत राहिले आणि नवनवीन ज्ञान-कौशल्ये जागेपणाने आत्मसात केली की महाविद्यालयीन जीवनात घेतलेल्या परिश्रमांची चांगली फळे आयुष्यभर चाखायला मिळतात. तरुणांनी फक्त परीक्षार्थी न होता आधुनिक तंत्रज्ञान अवगत करून आपल्यासोबत इतरांच्या आयुष्यात सप्तरंग भरावेत, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी येथे केले.

येथील तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये विद्यार्थ्यांचा प्रेरणा व स्वागत समारंभ झाला. या वेळी डॉ. शिंदे बोलत होते. प्राचार्य डॉ. जॉन डिसोझा यांनी स्वागत केले.

विद्यार्थ्यांना 'औषधनिर्मात्याची प्रतिज्ञा' देण्यात आली. लोकेश कोंडे, कशीश भालेकर या विद्यार्थ्यांची अनुक्रमे 'मिस्टर फ्रेशर' आणि 'मिस फ्रेशर' म्हणून निवड झाली. महाविद्यालयातील औषधी वनस्पती व उपकारणांची माहिती व्हिडिओद्वारे प्रदर्शित केलेल्या सानिका साळोखे, रेश्मा जमनिक यांचा सत्कार झाला. कार्यक्रमासाठी वारणा समूहाचे अध्यक्ष डॉ. विनय कोरे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विलास कार्जीनी यांचे सहकार्य लाभले. समन्वयक प्रा. सुप्रिया गायकवाड, डॉ. प्रवीण पाटील, डॉ. शर्वरी हर्डीकर, प्रा. शलाका पत्की, प्रा. आशा पाटील यांनी परिश्रम घेतले. डॉ. किरण पाटील यांनी आभार मानले.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठाचे तायक्वांदोत यश

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या तायक्वांदो संघाने राजस्थानमधील जेजेटी विद्यापीठात आयोजित अ.भा. आंतरविद्यापीठ तायक्वांदो पुरुष दक्षिण पश्चिम स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली. कबीरसिंह ठाकूर यांनी रौप्य, हर्षवर्धन सागर, ओंकार मार्तंड, शिरीष पडळकर, ऋषिकेश कोडळे, आदित्य लाख यांनी कांस्य प्राप्त केली. डॉ. विनायक भागवत, प्रा. गौरव चव्हाण, पद्माकर कांबळे यांनी प्रशिक्षक म्हणून काम पाहिले. कुलगुरू डॉ.डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ.शरद बनसोडे यांचे विजेत्यांना प्रोत्साहन लाभले.

जनसंपर्क कक्ष
10 NOV 2023 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ हिवाळी सत्रातील ४९ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे ४९ निकाल घोषित झाले आहेत. विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षा सुरू आहेत. गुरुवारी डिप्लोमा इन टॅक्सेशन, सर्टिफिकेट कोर्स इन शॉर्ट फिल्म मेकिंग, सर्टिफिकेट कोर्स इन डॉक्युमेंट्री आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालये व अधिविभागांमध्ये सुरळीतपणे झाल्या. १०० विद्यार्थी उपस्थित होते. त्यापैकी ९ विद्यार्थी अनुपस्थित होते. दि. ९ रोजी एमए (वुमेन स्टडीज), एमए (ड्रामा), एमए (म्युझिक), एमए (तबला), व्होकल इन्स्ट्रूमेंटल म्युझिक, बी.व्होक. ऑटोमोबाईल, बी.लिब., पीजी डिप्लोमा इन न्यूट्रिशन आदी २१ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले.

पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या ४९ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षा सुरू आहेत. गुरुवारी ३ अभ्यासक्रमांच्या परीक्षा विविध महाविद्यालये व अधिविभागामध्ये सुरळीतपणे पार पडल्या. दिवसभरात २१ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले असून, आजअखेर ४९ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत, अशी माहिती परीक्षा विभागातर्फे देण्यात आली. परीक्षा विभागातर्फे परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे. गुरुवारी या पथकाकडून सांगली ४, कोल्हापूर ४, सातारा ६ असे तिन्ही जिल्ह्यांतून एकूण १४ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद करण्यात आली आहे.